मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेमध्ये कर्मचारी-नागरिकांना आता हेल्मेटसक्ती

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रवेशद्वारावरच नो एन्ट्री : महापालिकेच्या आवारात कर्मचारी, अधिकारी, नागरिकांना हेल्मेट सक्ती लागू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पालिकेच्या प्रवेशद्वारावर हेल्मेट सक्ती लागू केली आहे. त्यामुळे आता महापालिकेतील कर्मचारी किंवा कामानिमित्त आलेले नागरिक यांना हेल्मेट परिधान करूनच महापालिकेच्या प्रवेशद्वार अथवा आवारात प्रवेश करावा लागेल. तशा सूचना पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी सुरक्षा विभागाला दिल्या आहेत.



विधानसभा निवडणुकीच्या दरम्यानच्या काळात जिल्हा प्रशासनाकडून हेल्मेट सक्तीचा आदेश काढण्यात आला होता. तसा आदेश पिंपरी चिंचवड महापालिकेला पाठवला होता. त्या आदेशात महापालिकेतील कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांना हेल्मेट सक्तीबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यामुळे निवडणुकीच्या कालावधीमध्येच महापालिकेतील कर्मचाऱ्यांना हेल्मेट सक्ती लागू झाली होती. परंतु महापालिका आयुक्तांनी महापालिकेच्या आवारात येणाऱ्या सर्वच कर्मचारी, अधिकारी, नागरिकांना हेल्मेट सक्ती लागू केली आहे.

महापालिकेत विविध कामानिमित्त शुक्रवारी येणा-या नागरिकांना विना हेल्मेट आलेल्यांना प्रवेशद्वार अडविण्यात आले. हेल्मेट नसलेल्या नागरिकांना आयुक्तांनी अचानक काढलेल्या आदेशाने मनस्ताप सहन करावा लागला. अनेकांना प्रवेशद्वाराच्या बाहेरच सुरक्षारक्षकांनी अडवले. त्यामुळे नागरिकांना काम न करताच माघारी फिरावे लागले.

याबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेचे सुरक्षा विभागाचे मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे यांनी देखील या वृत्ताला दुजोरा दिला. पिंपरी चिंचवड पोलिसांकडून हेल्मेट सक्तीबाबत सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच आयुक्तांनीसुद्धा तशा सूचना केल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

हेल्मेट सक्तीबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून आलेल्या सूचनांमुळे आता नागरिकदेखील हेल्मेट सक्तीच्या फेऱ्यामध्ये अडकले आहेत. त्यांनादेखील हेल्मेट परिधान करून महापालिकेत प्रवेश करावा लागेल. नियमांना बगल दिल्यास पालिकेकडून कारवाई करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पालिकेच्या प्रवेशद्वारावर हेल्मेट सक्ती लागू केली आहे. त्यामुळे आता महापालिकेतील कर्मचारी किंवा कामानिमित्त आलेले नागरिक यांना हेल्मेट परिधान करूनच महापालिकेच्या प्रवेशद्वार अथवा आवारात प्रवेश करावा लागेल.

# थंडीमुळे सर्दी खोकल्याचे रुग्ण वाढले

## वातावरणीय बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील आठवडाभरापासून थंडी वाढली आहे. त्यातही दोन दिवसांपासून थंडीची तीव्रता अधिक वाढली आहे. या वाढत्या गारठ्यामुळे आणि वातावरणीय बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यामुळे सर्दी व खोकला याचे रुग्ण वाढले असून नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य अधिकाऱ्यांनी केले आहे.



थंडीचा ऋतू नुकताच कुठे सुरु होतोय, त्यात वातावरणीय बदलामुळे रुग्ण संख्याही झपाट्याने वाढू लागली आहे. वातावरणातील बदलामुळे घरोघरी थंडी, खोकल्याचे रुग्ण आढळून येत आहेत. प्रामुख्याने लहान मुले, वृद्ध नागरिक आणि महिला यांच्यामध्ये आजारी पडण्याचे प्रमाण अधिक आहे. शासकीय व खासगी रुग्णालयात अशा रुग्णाची संख्या अधिक दिसत आहे.

अनेक नागरिक थेट दवाखान्यात जाण्याऐवजी मेडिकलमधून तात्पुरते सर्दी आणि खोकला यांच्या गोळ्या विकत घेत आहेत. परंतु हे योग्य नसून अधिक वेळ वाट न पाहता योग्य उपचार घ्यावेत, असा सल्ला आरोग्य अधिकाऱ्यांनी दिला आहे. सर्दी, खोकला याप्रमाणेच अंगदुखीचे रुग्ण आणि दम्याचे रुग्ण यांचीही संख्या अधिक दिसून येत आहे.

थंडी वाढत असल्याने नागरिकांनी शक्यतो उबदार कपडे वापरावेत. पाणी गरम करून प्यावे व शीत पेयाचा वापर टाळावा. दम्याचे रुग्ण वाढत असून दम्याचा त्रास असलेल्या रुग्णांनी तोंडाला मास्क लावावा व धुळीपासून संरक्षण करावे. तसेच सर्दी खोकला जास्त जात असेल त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधून योग्य औषध उपचार घ्यावेत.

# महाविजयाचे श्रेय जनतेच्या आशीर्वादाला : आमदार शंकर जगताप

## नवनिर्वाचित आमदार शंकर जगताप यांनी मतदारांचे आभार मानले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात ऐतिहासिक विजय प्राप्त केल्यानंतर नवनिर्वाचित आमदार शंकर जगताप यांनी मतदारांचे आभार मानले. पिंपळे गुरव, नवी सांगवी, आणि सांगवी परिसरातील जनतेने दाखवलेल्या विश्वासाने आणि प्रेमाने आपले मन भारावून गेले असल्याचे त्यांनी सांगितले.



“आपल्या सन्मानाने आणि प्रेमाने मी धन्य झालो आहे. तुमच्या आशीर्वादाने आणि पाठिंब्यानेच आज चिंचवड विधानसभा महाविजयाचा साक्षीदार ठरला आहे,” असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, “या विजयामध्ये माझ्या लाडक्या बहिणी, युवक-युवती, मार्गदर्शक ज्येष्ठ नागरिक, माझ्या सहकारी मंडळी आणि विशेषतः मायमाऊलींचा मोलाचा वाटा आहे. या परिसरातील सर्वांगीण विकासासाठी तुम्ही दिलेली साथ माझ्यासाठी महत्त्वाची आहे, आणि तुमच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील.”

शिक्षण, रोजगार, आरोग्य, अध्यात्म, आणि क्रीडा क्षेत्रात चिंचवडला उत्तुंग भरारी देण्याचे उद्दिष्ट त्यांनी व्यक्त केले. “आपल्या सहकार्यामुळे चिंचवड विधानसभा अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त आणि आदर्श मतदारसंघ म्हणून ओळखला जाईल,” असे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, भाषाप्रभू हभप पंकज महाराज गावडे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, माजी नगरसेवक शशिकांत कदम, सागर आंगोळकर, हर्षल ढोरे, संतोष कांबळे, प्रशांत शितोळे, राजेंद्र जगताप, राजू लोखंडे, माजी नगरसेविका उषा मुंढे नवी सांगवी आणि सांगवी परिसरातील सर्व सामाजिक संस्था, मंडळांचे अध्यक्ष, गृहनिर्माण सोसायटी पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# झिकाने पुन्हा पसरले हातपाय; सर्वाधिक रुग्ण पुण्याचे

## आजमितीस झिका रुग्णांची संख्या 140 वर पोहोचली असून यामध्ये सर्वाधिक रुग्णसंख्या पुण्यात आढळून आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

झिका रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. राज्यात आजमितीस झिका रुग्णांची संख्या १४० वर पोहोचली असून यामध्ये सर्वाधिक रुग्णसंख्या पुण्यात आढळून आली आहे. पुण्यामध्ये झिकाचे १०९ रुग्ण आढळून आले आहेत.

झिका रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. राज्यात आजमितीस झिका रुग्णांची संख्या १४० वर पोहोचली असून यामध्ये सर्वाधिक रुग्णसंख्या पुण्यात आढळून आली आहे. पुण्यामध्ये झिकाचे १०९ रुग्ण आढळून आले आहेत. विशेष म्हणजे १४० रुग्णांपैकी सुमारे ४० टक्के रुग्णसंख्या गर्भवती महिलांची आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास सुरुवात केली असून तापाच्या रुग्णांच्या सर्वेक्षणाला सुरुवातदेखील केली आहे.



राज्यातील झिकाचा पहिला रुग्ण पुण्यात आढळून आला होता. त्यानंतर राज्यातील २ हजार ६८ संशयित झिका रुग्णांचे रक्तनमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान प्रयोगशाळेत (एनआयव्ही) पाठविण्यात आले होते. चालू वर्षात २८ नोव्हेंबरपर्यंत त्यातील १४० जणांचे झिकाचे निदान झाले. यामध्ये ६३ गर्भवती महिला आहेत.

याविषयी 'सीविक मिरर'सोबत बोलताना आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. बबिता कमलापूरकर म्हणाल्या, "झिकाची लागण झालेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल व्हावे लागत नाही. या आजारामुळे मृत्यू होण्याचे प्रमाणही नगण्य आहे." नागरिकांना ताप आल्यास घाबरून न जाता डॉक्टरांना दाखवून वेळीच उपचार घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

झिकाचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात ३ ते ५ किलोमीटर परिसरात तापरुग्णांचे सर्वेक्षण आरोग्य विभागाकडून सुरू आहे. याचबरोबर झिकाचा प्रसार एडिस इजिप्ती डासांमुळे होत असल्याने कीटकनाशक फवारणीसह इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

### पाच रुग्णांचा शहरात आतापर्यंत बळी

» पुणे महापालिकेच्या हद्दीमध्ये झिकाचे १०९ रुग्ण आढळून आल्याचे सांगण्यात आले. त्या खालोखाल अहिल्यानगर (संगमनेर) ११ रुग्ण, पुणे ग्रामीण १० रुग्ण, पिंपरी-चिंचवड महापालिका ६ रुग्ण आणि सांगली, मिरज, कोल्हापूर, सोलापूर, दादर (उत्तर) मुंबईत प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे. दरम्यान, पुण्यात आतापर्यंत झिकाच्या पाच रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. हे सर्व ज्येष्ठ नागरिक होते. प्रत्येकाला आधीचे काही ना काही आजारपण होते. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाच्या मृत्यू परीक्षण समितीने दिलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### आरोग्य विभागाकडून उपाययोजना

- » झिकाचा रुग्ण आढळून आल्यास परिसरात तापरुग्णांचे सर्वेक्षण
- » गर्भवती महिलांची प्राधान्याने तपासणी
- » सर्व तापरुग्णांवर लक्षणाच्या आधारे उपचार
- » गर्भवती महिलांना झिकाच्या धोक्याबाबत मार्गदर्शन
- » डास प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर
- » संशयित रुग्णांची माहिती कळविण्याची खासगी डॉक्टरांना सूचना
- » एडिस इजिप्ती डासांमुळे आजार होत असल्याने कीटकनाशक फवारणी

# अबब् ! 200 सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई...

## हेल्मेट परिधान न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाईला सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसह, ग्रामीण भागातील हेल्मेट परिधान न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाईला सुरुवात झाली आहे. पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) २०० हून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई केली आहे. आता सोमवार (दोन डिसेंबर) सरकारी कार्यालयांमध्ये दुचाकीवरून येणाऱ्या नागरिकांवरही कारवाई करण्यात येणार आहे.



सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अभय सप्रे यांनी पुण्यातील आरटीओ, पोलीस, जिल्हा प्रशानासह इतर विभागातील अधिकाऱ्यासोबत बैठक घेतली होती. या बैठकीत शहर आणि जिल्ह्यातील अपघातांचा आढावा घेतला. होता. या अपघातांमध्ये सर्वाधिक मृत्यूचे प्रमाण दुचाकी चालकांचे असल्याचे आकडेवारीवरून समोर आले होते. हेल्मट सक्ती असताना हेल्मेट न घालणाऱ्या चालकांवर पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याचा मुद्दा चर्चेत आला होता. या पार्श्वभूमीवर हेल्मेटसक्तीची अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्याच्या वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी दिले. जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी प्रशासकीय कार्यालयांपासून हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायत आणि इतर सरकारी कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचारी आणि कार्यालयांत कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना हेल्मेटसक्ती करण्याचे आदेश दिले आहेत.

'आरटीओ'कडून कारवाईला सुरुवात करण्यात आली असून विविध कार्यालयातील २०५ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई वाढविण्यात येईल, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिली.

# तोतया डॉक्टरला दोन वर्ष सक्तमजुरी

## वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करणाऱ्या तोतया डॉक्टरला न्यायालयाने दणका दिला.

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करणाऱ्या तोतया डॉक्टरला न्यायालयाने दणका दिला. खडकी न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल. व्ही. श्रीखंडे यांनी तोतया डॉक्टरला दोन वर्ष सक्तमजुरी आणि दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.



मीलनकुमार अमर ठाकूर (वय ३४, रा. धानोरी, मूळ रा. पश्चिम बंगाल) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. ठाकूर वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करत होता. याबाबतची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाला मिळाली. त्यानंतर महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रेखा उमेश गलांडे यांनी विश्रांतवाडी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी कारवाई करून ठाकूरला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्या दवाखान्यात औषधांचा साठा सापडला होता.

विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सूर्यकांत मारुडे यांनी याप्रकरणाचा तपास करुन ठाकूरविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. सरकार पक्षाकडून सहायक सरकारी वकील सायली ठोकळ यांनी बाजू मांडली. सहायक फौजदार पाटील, हवालदार कोळप आणि पाटील यांनी न्यायालयीन कामकाजात सहाय केले. साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने ठाकूरला दोषी ठरवून त्याला दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल. व्ही. श्रीखंडे यांनी तोतया डॉक्टरला दोन वर्ष सक्तमजुरी आणि दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

# पिंपरी, चिंचवड स्टेशनचे कालबाह्य उड्डाणपूल पाडण्यासाठी रेल्वेकडून महापालिकेला पत्र

## या कामासाठी दिनांक 3 डिसेंबरपासून प्रायोगिक तत्त्वावर हा रस्ता बंद करण्यात येणार आहे. झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी गावाला जोडणारा इंदिरा गांधी उड्डाण पूल आणि चिंचवड स्टेशन या रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल हे कालबाह्य झाले आहेत. महापालिकेने या दोन्ही उड्डाणपुलांची तात्पुरती दुरुस्तीदेखील केली होती. तरीही हे दोन्ही उड्डाणपूल धोकादायक बनले असून त्या पुलांचे आयुष्य संपले आहे. गंभीर अपघात होण्याची वाट बघण्यापूर्वी हे दोन्ही उड्डाणपूल पाडण्यात यावे, अशी मागणी जागरूक पिंपरी-चिंचवडवासियांकडून करण्यात येत आहे.

हे दोन्ही उड्डाण पूल तत्काळ पाडण्यात यावे, जेणेकरून भविष्यातील अपघात टाळण्यात येईल, असे पत्र रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला देण्यात आले आहे. रेल्वे विभागाने पाठवलेल्या पत्रावर महापालिका आता कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरीगाव, मार्केट येथील इंदिरा गांधी उड्डाण पूल खूप जीर्ण झाला आहे. तसेच, चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई जुना महामार्ग आणि चिंचवड गावाला जोडणारा उड्डाणपूलदेखील कालबाह्य झाला आहे. हे दोन्ही उड्डाणपूल पाडण्यात यावे, यासाठी नागरिकांकडून अनेकदा पाठपुरावा करण्यात आला. रेल्वे मार्गावरील दोन्ही उड्डाणपूल तत्काळ पाडण्यात यावे, याकरिता रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला पत्र देऊन पाठपुरावा सुरू आहे. परंतु, हे उड्डाणपूल पाडल्यास पिंपरी आणि चिंचवड गावाकडे जाणारी वाहतूक कोणत्या मार्गाने सोडायची, असा प्रश्न महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पडला आहे.

पुणे-मुंबई जुना महामार्ग आणि पिंपरी गावास जोडणारा पुणे-लोणावळा लोहमार्गावरील पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पूल हा शहरातील सर्वांत पहिला पूल आहे. “या उड्डाणपुलाचे आयुष्य संपले आहे. सगळे बांधकाम धोकादायक झाले आहे. तो पूल वाहतुकीस बंद करा. पूल पाडून टाका,” असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेस तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या कार्यकाळात पाठविले होते. शहरातील दोन भागांना जोडणारा हा महत्त्वाचा पुल असल्याने महापालिकेने पुलाचे स्ट्रॅक्चरल ऑडिट केले. त्यानंतर त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले. हे काम सुमारे दोन ते तीन वर्षे सुरू होते. त्यावर उड्डाणपूल दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आला. त्यानंतर पिंपरीच्या उड्डाणपुलाचे मजबुतीकरण करण्यात आले आहे.

शहरातील चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाणपुलाच्या बांधकामास ४७ वर्षे झाली आहेत. हेही बांधकाम धोकादायक झाले असून, तो पूल पाडा, असे पत्र रेल्वेने महापालिकेस नुकतेच पाठविले आहे. या पुलाशेजारी महापालिकेने सुमारे १५ वर्षांपूर्वी समांतर पूल बांधला आहे.



### दोन्ही उड्डाणपूल पाडल्यास वाहतूक कोंडी होणार

» पिंपरीगाव आणि चिंचवडगाव या दोन्ही उपनगराला जोडणाऱ्या रेल्वे मार्गावरील उड्डाण पूल हे धोकादायक बनले आहेत. यातील पिंपरीच्या इंदिरा गांधी उड्डाणपुलावर कोट्यवधी रुपये खर्च करून देखभाल दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे हा पूल आणखी पाच वर्ष सुरू राहिल्यास काहीच अडचण राहणार नाही. चिंचवड स्टेशन येथील उड्डाण पूलदेखील कालबाह्य झालेला आहे. या पुलावर अवजड वाहतूक बंद केलेली आहे. त्यामुळे दोन्ही पुलांसाठी पर्यायी व्यवस्था उभी करण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. त्याकरिता पिंपरीत डेअरी फार्म येथील पुलाचे युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, चिंचवड स्टेशन येथून अद्याप कोणतीही पर्यायी यंत्रणा नाही. त्यामुळे दोन्ही उड्डाण पूल लगेच पाडल्यास प्रचंड वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. नागरिकांना वळसा घालून पिंपरी, चिंचवडला जावे लागणार आहे.

> “ चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाण पुलास ४७ वर्षे झाली आहेत. त्यामुळे पुलाचे बांधकाम धोकादायक झाले आहे. तो पूल पाडावा, असे रेल्वेचे पत्र महापालिकेस प्राप्त झाले आहे. यापूर्वीच पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पूल पाडावा, असे रेल्वेचे पत्र आले आहे. त्या पुलाचे मजबुतीकरण करण्यात आले आहे. या दोन्ही पुलांचे काय करायचे, या संदर्भात आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

# रावेत गृहप्रकल्पासाठी पुन्हा निविदा काढणार

## लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान 2 ते 3 वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पांची निविदा रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने निविदाप्रक्रिया राबविली जाणार आहे. ऑक्टोबर २०२० पासून बंद असलेले हे काम, त्यात निविदाप्रक्रिया राबविण्यात लागणारा कालावधी यामुळे लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान २ ते ३ वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

रावेत येथील २ हेक्टर जागेत हा प्रकल्प राबवला जात आहे. त्यासाठी २०१९ ला निविदाप्रक्रिया राबवण्यात आली होती. त्या गृहप्रकल्प बांधकामाची वर्कऑर्डर ३० मे २०१९ ला देण्यात आली. एकूण ७९ कोटी ४५ लाख ९२ हजार ७९० रुपये खर्चाचे काम मन इन्फ्रा. कन्स्ट्रक्शन देण्यात आले आहे. इमारतीचे काम सुरू करण्यात आले. फाउंडेशनचे काम झाले होते. प्रकल्पाविरोधात रावेत येथील मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने कामास स्थगिती दिल्याने तेथील काम ऑक्टोबर २०२० पासून ठप्प आहे.

उच्च न्यायालयाने याचिका फेटाळत महापालिकेस काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत काम सुरू करण्यास परवानगी दिली आहे. न्यायालयीन अडचण दूर झाल्याने काम लवकरच सुरू होईल, अशी लाभार्थ्यांना आस होती. दरम्यान, मागील चार वर्षांपासून हे काम बंद आहे. तसेच, बांधकाम साहित्यांचे दर महाग झाल्याने खर्च वाढला आहे. त्यामुळे या प्रकल्पाची नव्याने निविदा काढण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पांची निविदा रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने निविदाप्रक्रिया राबविली जाणार आहे. ऑक्टोबर २०२० पासून बंद असलेले हे काम, त्यात निविदाप्रक्रिया राबविण्यात लागणारा कालावधी यामुळे लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान २ ते ३ वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.



### लाभार्थ्यांना घराची आस

» रावेत गृहप्रकल्पात ३२३ चौरस फूट चटई क्षेत्र आकाराच्या एकूण ९३४ सदनिका आहेत. सदनिकांची सोडत २७ फेब्रुवारी २०२१ ला काढण्यात आली. त्यासाठी लाभार्थ्यांकडून ५ हजार रुपये महापालिकेने जमा करून घेतले. पावणेचार वर्षे झाले तरी, सदनिका न मिळाल्याने लाभार्थी नाराजी व्यक्त करीत आहेत. नव्याने निविदाप्रक्रिया राबवण्यास किमान ३ ते ४ महिन्यांचा कालावधी जाणार आहे. विधानसभा आचारसंहितेनंतर निविदा प्रकिया सुरू होईल. त्यानंतर प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यास अडीच ते तीन वर्षांचा कालावधी लागू शकतो. म्हणजे आणखी किमान तीन वर्षे घरासाठी सर्वसामान्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# अखेर 'सारथी'ची माघार; स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांचा पूर्व प्रशिक्षणाचा मार्ग मोकळा

## छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानवविकास संस्थेकडून यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि एसएससी आदी स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण दिले जाते.

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानवविकास संस्थेकडून (सारथी) यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि एसएससी आदी स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण दिले जाते. पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येते. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांनीच खासगी क्लासच्या संस्था निवडाव्या, यासाठी राज्य शासनाने समान धोरण समिती स्थापन केली आहे. मात्र या समितीपासून लांब राहत खासगी संस्थांच्या हिताचा निर्णय घेतला जाणार असल्याचा आरोप सारथीवर केला जात होता. याबाबतचे वृत्त प्रकाशित करुन 'सीविक मिरर'ने सारथीला चांगलाच दणका दिला होता. त्यानंतर सारथीने यू टर्न घेत या समितीत समावेश होण्याचा निर्णय घेतला असून तसे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे पूर्वप्रशिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला.



### 11 महिन्यांचे पूर्ण प्रशिक्षण अन् विद्यावेतन

» या समितीतून निविदा प्रक्रिया राबविणे अपेक्षित असताना सारथी संस्थेने या समितीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अद्याप कोणतेही प्रशिक्षण मिळालेले नाही. सारथी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालकांनी हा निर्णय केवळ काही संस्थेच्या माध्यमातून मलिदा लाटण्यासाठीच केला असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी करत होते. सारथीने घेतलेल्या भूमिकेमुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. परंतु आता तत्काळ विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचे आवाहन केले आहे. त्यानंतर ११ महिन्यांचे पूर्वप्रशिक्षण दिले जाणार असून त्याबदल्यात विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाणार आहे.

राज्य शासनाने सारथी, बार्टी, महाज्योती आणि टीआरटीआय या संस्थांच्या योजनासाठी समान धोरण आखले होते. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी टीआरटीआयचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भारूड यांच्या नेतृत्वाखाली उपसमिती नेमण्यात आली होती. त्यानंतर बार्टी आणि टीआरटीआय या दोन संस्थांनी समान धोरणात सहभागी होत निविदा प्रक्रिया राबविली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे खासगी क्लासेसला पसंती दर्शविली आणि पूर्व प्रशिक्षणदेखील सुरु झाले. मात्र महाज्योतीने या धोरणावर शंका उपस्थित करत या प्रक्रियेत सहभाग घेतला नाही. त्याचप्रमाणे सारथीने भूमिका घेतली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मर्जीपेक्षा खासगी क्लास चालकांच्या मर्जीला प्राधान्य या संस्थ्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून दिले जात होते, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला होता.

> सारथीने घेतल्या भूमिकेमुळे मराठा समाजातील सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले. या विरोधात स्टुडंट हेल्पिंग हँड्सने याबाबत शासनाला वेळोवेळी जाब विचारला. मंत्रालय आणि प्रशासनासमोर वारंवार हा मुद्दा उपस्थित केला. संचालक अशोक काकडे यांना भेटून या प्रकरणाचा पुनर्विचार करण्याची विनंती केली होती. आमच्या पाठपुराव्याला यश आले असून अखेर सारथीने समान धोरणाच्या माध्यमातून जाहिरात प्रसिद्ध केली. यामुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना न्याय मिळणार आहे. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो.
>
> \- ॲड. कुलदीप आंबेकर, अध्यक्ष, स्टुडंट हेल्पिंग हँड्स

> समान धोरण समितीनुसार इतर संस्थांनी प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांचे पूर्वप्रशिक्षणदेखील सुरू झाले आहे. या सगळ्यात मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन झालेली सारथी कुठेच नव्हती. याचा जाब सारथीच्या संचालकांना विचारण्यात आला होता. केवळ खासगी व्यक्तीने नोटीस दिली असे सांगून समान धोरणात समावेश घेतला जात नव्हता. ही बाब विश्वास ठेवण्यासारखी नव्हती. अखेर सारथीने समान धोरणात समावेश होत, विद्यार्थ्यांच्या हिताला महत्त्व दिले. हा निर्णय जाहीर केल्याने संचालकांचे आभार.
>
> \- नीलेश निंबाळकर, विद्यार्थी प्रतिनिधी

# राज्य शासनाची दूध अनुदानाची घोषणा हवेतच विरली?

## ऑक्टोबर, नोव्हेंबरचे प्रतिलिटर सात रुपये अद्यापही उत्पादकांच्या खात्यात जमा नाही

**पुणे | प्रतिनिधी**

मागील दोन वर्षांपासून गायीच्या दूधाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. दरम्यान, सप्टेंबर महिन्यांतील काही दिवसांचे पाच रूपये प्रतिलिटर दूध अनुदान तसेच ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांतील 7 रुपये दूध अनुदान रक्कम खासगी व शासकीय दूध संघाकडून अद्यापपर्यंत दूध उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यात आले नसल्याने शासनाकडून घोषणा होऊन जवळपास अडीच महिन्यांचा कालावधी संपत आला तरी देखील आजअखेर खासगी, शासकीय दूध संघाला दूधपुरवठा करणारे, दूध उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले असल्याने शासनाची घोषणा हवेतच विरली का, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.



दूध उत्पादक शेतक-यांना खासगी व सहकारी दूध संघ 30 रुपये प्रतिलिटर दर व राज्य सरकार पाच रुपये अनुदान असे एकूण प्रतिलिटर 35 रुपयांची दराची घोषणा शासनाकडून जून महिन्यात करण्यात आली होती दरम्यान, पाच रुपये दूध अनुदान रक्कम तब्बल साडेतीन महिन्यांनंतर दस-यांच्या नंतर दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरूवात झाली होती. दरम्यान, अनुदान पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जुलै, ऑगस्ट पूर्ण महिन्यांतील दूध अनुदान रक्कम जमा झाली. तसेच सप्टेंबर महिन्यांतील काहीच दिवसांची अनुदान रक्कम जमा झाली होती.

यानंतर सप्टेंबर महिन्यांतील मंत्रीमंडळ बैठकीत नव्या निर्णयानुसार दूध संस्थांना 28 रुपये दर देण्याचा निर्णय झाला होता. तर सात रुपये अनुदान शासनाकडून देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता. सहकारी व खासगी दूध प्रकल्पांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना 3.5 फॅट आणि 8.5 एसएनएफ या गुणप्रतिकरिता किमान 28 रुपये प्रतिलिटर इतका दर 1 ऑक्टोबरपासून दूध उत्पादकांच्या बँक खात्यावर देणे बंधनकारक होता.

त्यानंतर सरकार सात रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार होते. मात्र अनुदान उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यात आले नसल्याने शासनाकडून घोषणा होऊन जवळपास अडीच महिन्यांचा कालावधी संपत आला तरी देखील आजअखेर खासगी, शासकीय दूध संघाला दूधपुरवठा करणारे, दूध उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले असल्याने आगोदरच तोट्यात सापडत असलेला दूध उत्पादक शेतकऱ्यांला आर्थिक चणचण जाणवत आहे.

> शासनाकडून जाहीर केलेले 1 जुलै पासूनचे प्रतिलिटर पाच रुपये दूध अनुदान रक्कम जुलै, ऑगस्ट महिन्यांतील पात्र दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. सप्टेंबर महिन्यांतील काही दिवसांचे दूध अनुदान रक्कम तसेच ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांतील दूध अनुदान कात्रज सहकारी दूध संघाच्या दूध उत्पादन बळीरजाच्या बँक खात्यात डिसेंबर महिन्यांतील पहिल्या आठवड्यापासून जमा होण्यास सुरूवात होईल.
>
> \- तानाजी जगताप, संचालक, कात्रज सहकारी दूध संघ